Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

## * Central Library *

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 25/02/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष



## बालवाङ्मयकार विनायक कोंडदेव ओक

विनायक कोंडदेव ओक हे मराठीतील आद्य लघुकादंबरीकार होते. त्यांचा जन्म २५ फेब्रुवारी १८४० रोजी झाला. त्यांचे शालेय शिक्षण इंग्रजी तिसरीपर्यंतच झाले होते. दरमहा आठ रुपये पगारावर प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून त्यांनी नोकरीला प्रारंभ केला आणि दरमहा १०० रुपये पगार असलेले शिक्षणाधिकारी म्हणून ते निवृत्त झाले. १८६० च्या सुमारास ओकांनी आपल्या लेखनाला सुरुवात केली. तो काळ मराठीत विविध विषयांवर विपुल पुस्तके प्रसिद्ध होणारा नव्हता. फारशी मराठी पुस्तकेच अस्तित्वात नसल्यामुळे 'दक्षिणा प्राइज कमिटी' मराठी ग्रंथलेखनाला उत्तेजन देण्यासाठी पारितोषिके देत होती. शाळेतील मुलांना पुरवणी वाचन म्हणून वाचण्यासाठी मेजरथॉमस कँडीसारखी शिक्षण खात्याशी संबंधित माणसे स्वत:ही छोटी-छोटी पुस्तके लिहीत होती. अशा काळात ज्यांनी मुलांसाठी लिहिणे हेच आपले जीवित कर्तव्य मानले अशा मराठी लेखकांत विनायक ओक हे नाव अग्रभागी घ्यावे लागते. 'दिसामाजी काही तरी ते लिहावे' हा रामदासांचा उपदेश ओकांनी तंतोतंत पाळला होता.

दररोज निदान दोन पाने तरी लेखन केलेच पाहिजे, असा त्यांनी स्वत:ला दंडक घालून घेतला होता. ओकांनी १८८१ मध्ये 'बालबोध' नावाचे लहान मुलांसाठी असलेले मासिक सुरू केले. या मासिकाचे ते ३४ वर्षे संपादक होते. मासिकाचा सर्व मजकूर ते स्वत:च लिहून काढीत. या मासिकातील लेखनाव्यतिरिक्त ओकांच्या नावावर अनेक पुस्तके आहेत. त्यांची संख्या पन्नासच्या जवळपास भरेल. एकट्या 'बालबोध' मासिकातच चारशेहून अधिक कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. छोटे-छोटे निबंध लिहून ओकांनी नव्या पिढीला शालेय पुस्तकात नसलेली माहिती दिली. अशा या प्रतिभावान कादंबरीकाराचे ९ ऑक्टोबर १९१४ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Feb 25, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401